“पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान अंतर्गत पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहीम” राबविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जागृती०३१७/प्र.क्र.८१/अधिनियम**
९ वा मजला, नवीन मंत्रालय, नवीन गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४००००१.
तारीख: १७ एप्रिल, २०१७.

**प्रस्तावना :-**

दैनंदिन आयुष्याच्या सुखकर वाटचालीसाठी निरामय जीवन अत्यावश्यक गोष्ट आहे. शरीर आणि मन स्वस्थ असेल तर माणूस कोणतेही आव्हान सहजपणे पेलू शकतो. स्वस्थ व्यक्ति, स्वस्थ ग्राम आणि स्वस्थ राज्य या पायऱ्यावरुनच आपण स्वस्थ राष्ट्राचे अंतिम ध्येय गाठू शकतो. मा. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेनुसार स्वस्थ भारत घडवण्यासाठी स्वस्थ महाराष्ट्र अभियान राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

सदर अभियानाअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्हांदरम्यान गरीब, गरजु रुग्णांकरिता विनामूल्य वैद्यकीय सेवा देणे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम निवडक जिल्हयाच्या ठिकाणी पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहीम हाती घेण्याचे नियोजन आहे. पूर्वतपासणी मोहिमेच्या निष्कर्षानुसार आरोग्य यंत्रणेस प्रशिक्षण, आजाराबाबतची जनजागृती आणि शासनाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांमार्फत विनामूल्य उपचार उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे. या करिता संबंधित जिल्हयाचे प्रशासकीय प्रमुखांसोबत वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत सर्व शासकीय/ खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषदा, नगर पंचायत यांच्या अखत्यारितील आरोग्य विभाग यांच्या सहभागाने व विविध सामाजिक संस्था, सेवाभावी संस्था, अशासकीय संस्था, समाजसेवक यांच्या समन्वयाने सदर मोहीम राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत विविध जिल्हयादरम्यान गरीब, गरजू रुग्णांना त्यांच्या जिल्हयाच्या ठिकाणी आवश्यक वैद्यकीय सुविधा शासनाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांमार्फत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचा शासन निर्णय घेत आहे. तत्पूर्वी संबंधीत रुग्णांच्या आजाराचे निदान होण्यासाठी आणि त्या अनुषंगाने आवश्यक वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या नियोजनासाठी संबंधित जिल्हयांमधील गरीब, गरजू रुग्णांची आरोग्य पूर्व तपासणी करण्याचा शासन निर्णय घेत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र दिनापासून म्हणजेच १ मे, २०१७ पासून महाराष्ट्रातील सहा

महसुली विभागातील प्रत्येकी एक या प्रमाणे नाशिक, पालघर, अकोला, बीड, चंद्रपूर व सांगली या सहा जिल्हयांमध्ये प्रथम टप्प्यांत १ ते २७ मे, २०१७ दरम्यान पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिम राबविण्याचा शासन निर्णय घेत आहे.

२. सदर मोहिमे अंतर्गत श्वसनाचे विकार, पोटाचे विकार, हृदयरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, मेंदूचे विकार, मूत्ररोग, त्वचारोग, स्त्रीरोग, बालरोग, ग्रंथीचे विकार, मनोविकार, कर्करोग, नाक-कान-घसा विकार, दंतरोग, जनरल मेडीसीन, जनरल सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, लठ्ठपणा आदी विषयासंबंधीच्या आजारांची पूर्व तपासणी करण्यात येणार आहे.

३. आरोग्य पूर्व तपासणी मोहिमे करिता विविध विषयासंबंधीच्या आजारांसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तज्ञ समितीमार्फत, राज्यातील सामाजिक व पर्यावरणाची परिस्थिती लक्षात घेवुन उपलब्ध आरोग्य मानकांनुसार पूर्व तपासणीचे विहित नमुने अंतिम करण्यात आले आहेत.

४. तसेच, संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन यांनी तज्ञ समितीमार्फत अंतिम करण्यात आलेले पूर्व तपासणीचे विहित नमुने ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत संगणकीय प्रणाली विकसित केली आहे.

५. सदर मोहिमेअंतर्गत पथदर्शी जिल्हयातील प्रत्येक गावांगावांत प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत आरोग्य पूर्व तपासणी कक्ष स्थापित करण्यात येणार आहे. यासाठी आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक तसेच सरपंच व स्थानिक लोकप्रतिनिधी सामाजिक संस्था, समाजसेवक यांच्यामार्फत रुग्ण जागृती करुन त्यांना तपासणी कक्षामध्ये तपासणीसाठी उपस्थित राहण्याबाबत प्रवृत्त करण्यात येणार आहे.

६. शहरी भागाबाबत सदर मोहिमेअंतर्गत पथदर्शी जिल्हयातील शहरांमध्ये प्रत्येक प्रभागातील शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत आरोग्य पूर्व तपासणी कक्ष स्थापित करण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य सेवक व स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, समाजसेवक यांच्यामार्फत रुग्ण जागृती करुन त्यांना तपासणी कक्षामध्ये तपासणीसाठी उपस्थित राहण्याबाबत प्रवृत्त करण्यात येणार आहे.

७. पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेचे विविध जिल्हयादरम्यानचे संपूर्ण नियोजन करण्यासाठी एक राज्यस्तरीय समन्वय समिती व संबंधीत जिल्हास्तरीय समन्वय समिती गठित करण्यात येत आहे.

**<u>अ) राज्यस्तरीय समन्वय समिती</u> :-**

राज्यस्तरीय समन्वय समितीमध्ये मा. मंत्री वैद्यकीय शिक्षण हे अध्यक्ष असून मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग हे सह अध्यक्ष राहणार आहे. अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालये हे

सदर समितीचे राज्य समन्वय अधिकारी राहतील, सदर राज्यस्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मंत्री, वैद्यकीय शिक्षण विभाग | : | अध्यक्ष |
| २. | मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग | : | सह अध्यक्ष |
| ३. | राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण विभाग | : | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | : | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | : | सदस्य |
| ६. | मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना | : | सदस्य |
| ७. | आयुक्त (अन्न व औषध प्रशासन) | : | सदस्य |
| ८. | संचालक (वैद्यकीय शिक्षण व संशोधन) | : | सदस्य |
| ९. | संचालक (आयुष) | : | सदस्य |
| १०. | संचालक (आरोग्य सेवा) | : | सदस्य |
| ११. | अनुलोम सामाजिक संस्था यांचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| १२. | निरामय सामाजिक संस्था यांचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| १३. | अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई,राज्य समन्वय अधिकारी | : | सदस्य सचिव |

**ब) जिल्हास्तरीय समन्वय समिती :-**

जिल्हास्तरीय समन्वय समितीमध्ये संबंधीत जिल्हयाचे पालकमंत्री हे मुख्य समन्वयक तथा अध्यक्ष राहतील. सदर जिल्हास्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पालकमंत्री | : | मुख्य समन्वयक तथा अध्यक्ष |
| २. | सर्व खासदार /आमदार | : | सदस्य |
| ३. | जि.प. अध्यक्ष/ महापौर/नगराध्यक्ष | : | सदस्य |
| ४. | जिल्हाधिकारी | : | सदस्य |
| ५. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | : | सदस्य |
| ६. | आयुक्त /मुख्याधिकारी महानगरपालिका/नगरपालिका | : | सदस्य |
| ७. | उप संचालक (आरोग्य) | : | सदस्य |
| ८. | जिल्हा शल्यचिकित्सक | : | सदस्य सचिव |
| ९. | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय | : | सह सदस्य सचिव |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | जिल्हा आरोग्य अधिकारी | : | सह सदस्य सचिव |
| ११. | अधिष्ठाता, खाजगी वैद्यकिय/दंत/आयुर्वेद /होमिओपॅथी महाविद्यालय | : | सदस्य |
| १२. | मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/ नगर परिषद/ नगर पंचायत | : | सदस्य |
| १३. | जिल्हा समन्वय अधिकारी, जीवनदायी आरोग्य योजना | : | सदस्य |
| १४. | जिल्हा माहिती अधिकारी | : | सदस्य |
| १५. | जिल्हा आयुर्वेद विस्तार अधिकारी | : | सदस्य |
| १६. | अनुलोम सामाजिक संस्था यांचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| १७. | सहाय्यक संचालक (आयुष) | : | सदस्य |

८. सर्व गरजू रुग्णांचा पूर्व तपासणीसाठीच्या अंतिम करण्यात आलेल्या विहित नमुन्यामध्ये आजारनिहाय तपशील संगणकीय प्रणालीवर व शासनांमार्फत उपलब्ध केलेल्या विवरण पत्रामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गतच्या आरोग्य पूर्व तपासणी कक्षामार्फत नोंद करण्यात येणार आहे व त्याबाबतचा दैनंदिन अहवाल जिल्हा समन्वय समिती सदस्य सचिव यांना सादर करावयाचा आहे.

९. जिल्हयातील सर्व रुग्णांना आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा समन्वय समितीने स्थानिक प्रशासकीय अधिकारी, स्थानिक आरोग्य यंत्रणा व कर्मचारी यांना दि. २४ ते २९ एप्रिल, २०१७ या कालावधीमध्ये सविस्तर बैठका घेऊन प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे.

१०. तसेच, या पूर्व तपासणी मोहीमे दरम्यान तपासणी झालेल्या रुग्णांचा सविस्तर अहवाल दि. ३१ मे, २०१७ अखेर जिल्हा समिती सदस्य सचिव यांनी राज्य समन्वय अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

११. जिल्हास्तरीय समन्वय समितीने पूर्व तपासणी कालावधीमध्ये ( १ ते २७ मे, २०१७ ) सदर मोहिमेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणे सोबत किमान आठवडयातून एक वेळेस आढावा बैठक घेऊन राज्यस्तरीय समितीस अहवाल सादर करावा. तसेच राज्य समन्वय समितीने देखील तपासणी कालावधीत दरम्यान संबंधीत जिल्हा समन्वय समिती सोबत व्हिडिओ कॉन्फरंसद्वारे आढावा बैठक घेण्यात यावी.

१२. 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेचा शुभारंभ जिल्हास्तरीय समन्वय समितीने संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री व प्रशासन प्रमुख, आरोग्य विभाग प्रमुख, वैद्यकीय महाविद्यालय प्रमुख यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र दिनी दिनांक १ मे, २०१७ रोजी एकाच वेळी राज्यभरात करावा.

१३. पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-

| टप्पा | दिनांक | महसूल विभाग | जिल्हा |
|---|---|---|---|
| टप्पा क्र.१ | १ ते २७ मे, २०१७ | नाशिक | नाशिक |
| | | औरंगाबाद | बीड |
| | | नागपूर | चंद्रपूर |
| | | पुणे | सांगली |
| | | कोकण | पालघर |
| | | अमरावती | अकोला |

१४. 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेच्या निष्कर्षानुसार संबंधित जिल्हयातील आढळून आलेल्या आजारांबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रम व आरोग्य यंत्रणेस प्रशिक्षण हे संबंधित जिल्हास्तरीय समन्वय समितीमार्फत आयोजित करण्यात यावे.

१५. 'पंडित दीन दयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेच्या निष्कर्षानुसार आढळून आलेल्या गरजू रुग्णांना त्यांच्या जिल्हयाच्या ठिकाणी आवश्यक वैद्यकीय सुविधा शासनाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांमार्फत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय समन्वय समितीने राज्यस्तरीय समन्वय समितीसोबत तात्काळ सविस्तर नियोजन करुन प्रत्येक गरजू रुग्णाला अभियानाचा लाभ होण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी करावी.

१६. त्याशिवाय ज्या रुग्णांना अस्तित्वात असणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ मिळू शकणार नाही अशा रुग्णांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीद्वारे उपचारांसाठी मदत मिळणेकरीता जिल्हा समन्वय समितीच्या सदस्य सचिव (जिल्हा शल्य चिकित्सक ) यांनी यथोचित प्रस्ताव संबंधितांना सादर करुन पाठपुरावा करावा व व या करीता स्वतंत्र रुग्ण सहायता कक्ष स्थापन करण्यात यावा.

१७. त्या शिवाय वरील पैकी दोन्ही ठिकाणी उपचारास पुरेशी मदत न मिळू शकणा-या रुग्णांसाठी सामाजिक संस्था, अशासकीय संस्था तसेच सामूदायिक सामाजिक दायित्व (CSR ) निधीद्वारे उपचारास मदत उपलब्ध करुन देणेबाबत मा.मुख्यमंत्री यांचे आरोग्य सल्लागार व राज्य समन्वय अधिकारी यांनी स्वतंत्र कक्ष स्थापून नियोजन करावे.

१८. 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत पथदर्शी आरोग्य पूर्व तपासणी मोहिमेच्या निष्कर्षानुसार आढळून आलेल्या विविध आजारांबाबत संशोधन करुन शासनस्तरावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे नियोजन राज्यस्तरीय समन्वय समितीने करावी. या मोहिमेच्या

आधारावर संपूर्ण राज्यात 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' राबविण्यात येणार आहे. तसेच प्रस्तावित महात्मा फुले जिल्हा आरोग्य योजनेची पुढील आखणी करण्यात येणार आहे.

१९. या योजनेअंतर्गत कार्यरत शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना प्रवास खर्च व दैनंदिन खर्च संबंधित प्रशासकीय आस्थापनामार्फत नियमानुसार अनुज्ञेय राहील.

२०. 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियान' राबविण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतूदीबाबत स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

२१. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०४१७१४१०३२७३१३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरी साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrinivas P. Kotwal

Digitally signed by Shrinivas P. Kotwal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education And Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798644845edd3b3fb5ef54c3051c62, cn=Shrinivas P. Kotwal
Date: 2017.04.17 17:23:47 +05'30'

**श्रीनिवास पुं. कोतवाल**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०००२१.
३. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०००२१.
४. मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. सर्व पालक मंत्री,
८. सर्व खासदार/सर्व आमदार/ सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/सर्व महापौर/सर्व नगराध्यक्ष
९. मा. मुख्यमंत्री यांचे आरोग्य सल्लागार.
१०.मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
११.मा. अपर मुख्य सचिव, सर्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३.सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
१४.सर्व विभागीय आयुक्त, महसूल.
१५.सर्व जिल्हाधिकारी.
१६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७.सर्व आयुक्त महानगरपालिका
१८. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक,
२०.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१.संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना.
२४. सर्व उपसंचालक, आरोग्य
२५.सर्व जिल्हा शल्यचिकित्सक.
२६.अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई.
२७.सर्व अधिष्ठाता शासकीय/ खाजगी वैद्यकीय/ दंत/ आयुर्वेद/ होमिओपॅथी महाविद्यालय.
२८. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
२९.सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/ नगर परिषद/ नगर पंचायत
३०.सर्व जिल्हा माहिती अधिकारी
३१.सर्व जिल्हा समन्वय अधिकारी, जीवनदायी आरोग्य योजना.
३२.सर्व जिल्हा आयुर्वेद विस्तार अधिकारी.
३३.सर्व मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका/ नगर पालिका/ नगर परिषद/ नगर पंचायत.
३४.सर्व सहसचिव/ उपसचिव/ अवर सचिव /कक्ष अधिकारी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
३५.सर्व सहाय्यक संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३६.अनुलोम सामाजिक संस्था
३७.निरामय सामाजिक संस्था
३८. निवडनस्ती (अधिनियम)